Pune Police

प्रेसनोट

दिनांक - ०३/११/२०१८

---

**व्यापा-याचे अपहरण करुन वीस कोटीची खंडणी मागणा-या गुन्हयातील मुख्य आरोपी जेरबंद जबरी चोरीचे गुन्हे उघड सात लाखाचा ऐवज हस्तगत जबरी चोरीचे दोन गुन्हे उघड**

---

दिनांक – ०६/१०/२०१८ रोजी दुपारी ०३/०० वा चे सुमारास वीर भारत सोसायटी भवानी पेठ पुणे येथुन आरोपी शहाबाज फिरोज खान रा - भवानी पेठ चुडामण चौक पुणे व त्याचे साथीदार सुयश राजु वाघमारे रा - भवानी पेठ पुणे व इतर यांनी संगणमत करुन फिर्यादी श्री महेंद्र ओंकारमल निबजिया रा - वीर भारत सोसायटी भवानी पेठ पुणे यांचा मुलगा दर्शन महेंद् निबजिया वय - २७ यास खंडणी साठी पळुन नेवुन त्यास सोडुन देण्यासाठी फिर्यादी यांचेकडे वीस कोटी रुपये खंडणी मागीतली व त्यानंतर पंधरा लाख रुपये दिले नाही तर मुलास ठार मारण्याची धमकी फिर्यादी यांना दिली आहे त्याबाबत खडक पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयामध्ये यापुर्वी गुन्हे शाखा व खडक पोलीस स्टेशन पुणे येथील पोलीसांनी गुन्हयातील आरोपी नामे १) सुरज लक्ष्मण चव्हाण वय – २५ रा - वडकी नाला हडपसर पुणे २) अरबाज फिरोज खान वय-२७ रा - भवानी पेठ पुणे ३) फरदीन परवेझ खान वय-१९ रा-कोंढवा खुर्द पुणे ४) साहील अब्दुल शेख वय-२३ रा-मिठानगर कोंढवा खुर्द पुणे यांना अटक केली आहे ते सर्वजण सध्या न्यायालयीन कोठडीत येरवडा मध्यवर्ती कारागृह पुणे येथे आहे.

गुन्हयातील मुख्य आरोपी शहाबाज फिरोज खान व सुयश राजु वाघमारे हे गुन्हा केल्यापासुन फरार होते आपण पकडले जावु नये म्हणुन ते अस्तीत्व लपवुन वेगवेगळया ठिकाणाहुन रस्त्याने जाणारे अनोळखी इसमाचा मोबाईल फोन घेवुन आपले जवळच्या लोकांशी संपर्क साधत होते. त्यामुळे ते पोलीसांना सापडत नव्हते व ते पोलीसांना गुंगारा देत होते.

दिंनाक – ०१/११/२०१८ रोजी संघटित गुन्हेगारी विरोधी पथक (पश्चिम) गुन्हे शाखा पुणे येथील अधिकारी व कर्मचारी सिंहगड रोड पुणे या भागात गस्त घालत असताना पोलीस कर्मचारी शकील शेख व संतोष क्षीरसागर यांना त्यांचे खब-याकडुन माहीती मिळाली की शहाबाज खान हा नांदेड सिटी समोर सिंहगड रोड येथे येणार आहे. अशी खबर मिळाल्यावरुन पोलीसांनी सापळा लावुन संशयीत इसम शहाबाज फिरोज खान वय – २९ रा – चुडामण चौक अमर सागर अपार्टमेंट भवानी पेठ पुणे यास ताब्यात घेतले आहे त्यावेळी त्याचे ताब्यात एक पल्सर मोटार सायकल, रोख रक्कम मिळाली आहे. त्याचेकडे सखोल तपास केला असता त्याने त्याचा साथीदार सुयश राजु वाघमारे याचेसह फरार झाल्यानंतर त्या कालावधीत त्यांचे पकडलेले इतर साथीदार यांना जेलमधुन सोडविण्यासाठी व इतर खर्चासाठी पैशाची आवश्यकता भासल्याने मुंढवा व नाना पेठ याठिकाणी जबरी चोरीचे गुन्हे केल्याची माहीती दिली आहे . त्याचे ताब्यातुन **रोख रुपये पाच लाख त्र्यॅऐंशी हजार दोनशे, एक ओपो व एक वन प्लस कंपनीचा मोबाईल फोन, गुन्हा करण्यासाठी वापरलेला कोयता व मोटार सायकल असा एकुण सहा लाख चौ-याऐंशी हजार रुपयेचा माल हस्तगत करण्यात आलेला आहे. त्यापैकी वन प्लस हा मोबाईल फोन अपहरण करण्यात आलेला मुलगा दर्शन निबजिया यांचा असल्याचे निष्पन्न झाले आहे.**

श्री. जितेंद्र भिमाराम माली वय-२६ रा – कस्तुरे चौक गंज पेठ पुणे हे दिनांक – १३/१०/२०१८ रोजी रात्रौ ०८/३० वा चे सुमारास ६१३ नाना पेठ चॉईस गार्डन पुणे येथे लिफ्टमधुन जात असताना दोन अज्ञात इसमांनी त्यांना चाकुचा धाक दाखवुन त्यांचेजवळील रोख दोन लाख पंचवीस हजार रुपये असलेली बॅग जबरदस्तीने चोरुन नेली होती. तसेच श्री मनोज राजकुमार केवरामनी वय-३९ रा – तम्हारा बिल्डिंग सी – ४०२ रहाटणी पिंपरी पुणे हे दिनांक – १७/१०/२०१८ रोजी दुपारी ०२/०० वा चे सुमारास हडपसर रेल्वे स्टेशन मुंढवा पुणे चे समोरुन त्यांचा मित्र शैलेश रणपिसे याचेसह ॲक्टिव्हा मोपेड वरुन जात असताना मोटार सायकलवरुन आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांना कोयत्याचा धाक दाखवुन त्यांचेजवळील रोख रक्कम रुपये सात लाख पंधरा हजार असलेली सॅकबॅग जबरदस्तीने चोरुन नेली होती त्याबाबत त्यांनी पोलीसांकडे तक्रार दिलेली आहे. सदर

दोन्ही गुन्हे संशयीत आरोपी शहाबाज फिरोज खान प त्याचा साथीदार सुयश राजु वाघमारे यांनी केल्याचे तपासात उघडकीस आलेले आहे. **शहाबाज खान याचेविरुध्द यापुर्वी डेक्कन, समर्थ, स्वारगेट, कोंढवा, वानवडी पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हे दाखल आहे त्यामध्ये जबरी चोरीचे चार, खुनाचा प्रयत्नाचा एक, चोरीचा एक, दुखापतीचा एक असे सात गुन्हयाचा समावेश आहे.** सुयश राजु वाघमारे वय – २६ रा - भवानी पेठ पुणे यास दिनांक – २९/१०/२०१८ रोजी गुन्हे शाखा युनिट ५ पुणे येथील पोलीसांनी अटक केली आहे.

मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो न्यायालय क्रंमाक १ पुणे शहर यांचे न्यायालयात आरोपीस हजर करण्यात आले होते. न्यायालयाने त्यास दिनांक - ०४/११/२०१८ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत.

सदरची कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहराचे श्री. समीर शेख स. पो. आ. गुन्हे-१ पुणे यांचे मार्गदर्शनाखाली संघटित गुन्हेगारी विरोधी पथक पश्चिम विभागाचे पोलीस निरीक्षक श्री. राम राजमाने, पोलीस उप निरीक्षक श्री. संजय गायकवाड, उत्तम बुदगुडे आणि पथकातील पोलीस कर्मचारी शकील शेख, संतोष क्षीरसागर, सर्फराज शेख, सपोफौ राजेंद्रसिंह चौहान, निलेश शिवतरे, रमेश चौधर, कैलास सांळुके, अजय उत्तेकर, विवेक जाधव, प्रविण पडवळ, सुनिल चिखले, प्रशांत पवार, संतोष देशपांडे, विजय गुरव, किरण ठवरे, राकेश खुणवे , संभाजी गंगावणे यांनी केली आहे. अधिक तपास पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड हे करत आहेत.

